महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
Email : cgmp@mahadiscom.in
Website : www.mahadiscom.in

क्र.मासंवि/रवका/न.क्र.२-ब/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
प्रकाशगड, ४ था मजला, प्लॉट नं.जी-९,
प्रो.अनंत काणेकर मार्ग, स्टेशन रोड,
बांद्रा (पुर्व), मुंबई - ४०० ०५१.
दुरध्वनी क्रमांक : ०२२- २६४७५९९५
फॅक्स क्रमांक ०२२-२६५८०६४२

# दुरूस्ती पत्रक क्र. २५ दि. १६ /०५ /२०१२

(म.रा.वि.वि.कं.मर्या.सेवा विनियम २००५)

**विषय** : महावितरण कंपनीमधील महिला कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेल्या गर्भपात/गर्भस्त्रावासाठीच्या रजेबाबत.

......

महावितरण कंपनीमधील महिला कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेल्या गर्भपात/गर्भस्त्रावासाठीच्या रजेच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने स्विकृत केलेली गर्भस्त्राव तसेच गर्भपाताच्या प्रसंगी द्यावयाच्या प्रसूति रजेच्या तरतुदीमध्ये केलेल्या सुधारणेनुसार सर्वंकष विचारांती व्यवस्थापकीय संचालक यांनी कर्मचारी सेवाविनियम क्र.५३ (घ) (१) मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यास मंजुरी प्रदान केली आहे.

**सेवाविनियम क्र.५३ (घ) (१)**

**गर्भस्त्राव किंवा गर्भपात आणि वैद्यकीय गर्भसमापन अधिनियम, १९७१ अन्वये घडवून आणलेला गर्भपात याच्या बाबतीत नोंदणीकृत वैद्यक व्यवसायीचे प्रमाणपत्राचे आधारे महिला कर्मचाऱ्यास तिच्या संपूर्ण सेवेच्या कालावधीमध्ये किती मुले हयात आहेत हे विचारात न घेता कमाल ४५ दिवस इतकी प्रसूति रजा अनुज्ञेय राहील.**

२. सदर दुरूस्ती पत्रक दि.०१.१०.२००९ पासून लागू राहिल.

३. सदर दुरूस्ती पत्रक कंपनीच्या इंट्रानेटवर उपलब्ध करण्यात आले आहे.

*( संदेश ए. हाके )*
*मुख्य महाव्यवस्थापक (मासं)*

*D:\O&M\Corrigondum-F.N.2-B-Miscarriage Leave.doc*
*16/05/2012*